# **रमता राम**

जिथे मी श्रमतो तिथे मी रमतो
जरी कोसळतो तरी सावरतो
मंचकी भूवरी कोठेही झोपतो
महाली वा कुटीतही मी राहतो

पोचण्या मुक्कामा नसे मज घाई
निघण्या प्रवासा नसे दिरंगाई
पायपीट होता न मी उदासीन
वाहन मिळता न मी सुखासीन

दुखे न पोटात खाता मी कदान्न
वाढे न भूक खाता मी पक्वान्न
हर्ष ना सुखात ना खेद दुःखात
प्रयत्नास माझ्या देई देव हात

– नारायण
०९/१८/२३